## निवडक

### सावईवेरे येथील नववर्ष स्वागत समितीतर्फे आजपासून विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २६ :** सावईवेरे येथील नववर्ष स्वागत समितीतर्फे उद्या गुरुवार दि. २७, २९ व ३० मार्च रोजी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

यानिमित्त उद्या गुरुवारी दि. २७ रोजी संध्याकाळी ५ ते ६ यावेळेत पंचांग माहितीवर आधारित कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून ही कार्यशाळा मदनंत सभागृहात होणार आहे.

शनिवारी दि. २९ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त नामवंत शिल्पकार व इतिहास संशोधक सचिन मदगे यांचे व्याख्यान होणार असून हा कार्यक्रम ग्रामपंचायत वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे.

रविवारी दि. ३० रोजी गुढीपूजन व नववर्ष स्वागत मिरवणूक होणार असून यानिमित्त सकाळी ६.३६ वाजता श्री सातेरी मंदिरात गुढीपूजन व तेथून श्री अनंत देवस्थानपर्यंत मिरवणूक काढण्यात येईल. त्यानंतर श्री अनंत देवस्थानात गुढीपूजन, आरती व तीर्थप्रसाद होईल. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

---

### माऊली वारकरी संप्रदायतर्फे २९ रोजी वारकऱ्यांसाठी प्रवेशिका वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २६ :** माऊली वारकरी संप्रदाय केरी सत्तरीतर्फे २ री आषाढी एकादशी पायी वारी २०२५ केरी (गोवा) ते पंढरपूर अशी होणार असून वारकऱ्यांसाठी प्रवेशिका वितरण कार्यक्रम शनिवार दि.२९ मार्च सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत श्री पारवडेश्वर मठ केरी सत्तरी येथे होणार आहे.प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर प्रवेश शुल्क रु. २५०० भरून प्रवेशिका वितरित केल्या जातील. प्रवेशिका स्विकारण्याची अंतिम तारीख रविवार दि. १३ एप्रिल सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल.

श्री पारवडेश्वर मठ केरी सत्तरी येथून,मंगळवार दि. २४ जून २०२५ रोजी सकाळी ८ वाजता वारी निघेल व १२ दिवस पायी प्रवास करून, शनिवार दि. ५ जुलै रोजी, सकाळी ९ वा. आषाढी एकादशी दिनी रविवार दि. ६ रोजी वारी पंढरपुरात दाखल होईल.पंढरपुर ते गोवा परतीचा प्रवास सोमवार दि. ७ रोजी सकाळी ६ वाजता होईल.अधिक माहितीसाठी खालिल कार्यकारी सदस्यांशी संपर्क साधावा. अध्यक्ष- अर्जुन गावस (९४२२६३९७२३), सचिव-लक्ष्मण बांदेकर (९३०९७८७६१९), कोषाध्यक्ष-कृष्णा माजिक (७०८३२३१३४८), उपाध्यक्ष-कृष्णा गावस (९९२३२४६४३६), सहसचिव-कमलाकांत पार्सेकर (८९७५२८४०२२), सह कोषाध्यक्ष-श्याम गावस (७९७२५६३७६७), सल्लागार-संतोष पार्सेकर (९५११८२९३३६) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### मांद्रे न्यू इंग्लिश प्राथमिक विद्यालयात ७ एप्रिलपासून उन्हाळी शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २६ :** मांद्रे येथील रमाकांत द. खलप विद्यालय, न्यू इंग्लिश प्राथमिक विद्यालय आणि नक्षत्र शिशुवाटिका, यांच्या वतीने ५ ते १० वर्षे वयोगटातील मुलांसाठी एक विशेष आणि आकर्षक उन्हाळी शिबिर आयोजित केले आहे. हे शिबिर ०७ एप्रिल ते १६ एप्रिल या कालावधीत आयोजित केले जाईल, आणि शिबिराचे सत्रे प्रत्येक दिवशी सकाळी ८.३० ते दुपारी १२.०० या वेळेत असतील.

या शिबिरात मुलांसाठी विविध रचनात्मक आणि शारीरिक विकासासाठी उपयुक्त सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. शिबिरातील प्रमुख सत्रे यामध्ये संगीत, नृत्य, योग, कला, हस्तकला आणि फोनॅटिक्स यांचा समावेश असेल.

मुलांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य वृद्धिंगत करण्यासाठी हे सत्रे एक आदर्श संधी ठरतील. मुलांना त्यांच्या कौशल्यांचा विकास करण्यास, त्यांच्या रचनात्मकतेला वाव देण्यास आणि शारीरिक स्वास्थ्य सुधारणेस मदत होईल.

शिबिरातील प्रत्येक सत्राची विशेष रचना असेल ज्यामुळे मुलांचा संपूर्ण विकास होईल आणि ते आनंदाने शिबिराचा अनुभव घेऊ शकतील.

याशिवाय, शिबिरामध्ये मुलांना एक मजेशीर आणि समृद्ध अनुभव मिळावा यासाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमही आयोजित केले जातील.

इच्छुक पालक आणि विद्यार्थ्यांनी अधिक माहिती आणि नोंदणीसाठी संबंधित शाळांशी संपर्क साधावा. हा एक उत्तम संधी आहे ज्यामुळे तुमच्या मुलांना एक उत्तम समर अनुभव मिळेल.

तुमच्या मुलासाठी हे शिबिर एक उत्तम शारीरिक, मानसिक, आणि शालेय बाह्य विकासाचा अनुभव देईल. त्यामुळे त्यांना ह्या उन्हाळ्यात सर्वांगिण विकास साधता येईल.अधिक माहिती साठी कृपया संपर्क करा:रमाकांत द. खलप विद्यालय न्यू इंग्लिश प्राथमिक विद्यालय नक्षत्र शिशुवाटिका, मांद्रे, यांच्याशी संपर्क साधावा असे कळविले आहे.

---

### म्हापसा येथे सावित्रीबाई फुले स्मृतिदिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २६ :** सावित्रीबाई फुले महिला मंडळतर्फे सावित्रीबाई फुले यांची १२८ स्मृतिदिन हॉटेल सुहास म्हापसा येथे संपन्न झाला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मल्लिका माटे उपस्थित होत्या. त्या म्हणाल्या की, १२८ वर्ष झाली तरी आपण सावित्रीबाईंची स्मृती दिन आठवण करतो कारण त्यांनी महिलांना शिक्षणाची संधी दिली त्यामुळे आम्ही महिला मोठ्या पदावर पोहोचलो खास पाहुणे कृष्णा गावकर यांनी ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. प्रमुख वक्त्या गौतमी अमोणकर यांनी ज्योतिराव फुले व डॉ. आंबेडकर यांचे विचार मांडले सन्माननीय पाहुणे सतीश कोरगावकर यांनी सावित्रीबाई फुले महिला मंडळाचे कौतुक केले पुष्पा वामन रेडकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

अशोक परवार यांनी म्हटले की, जास्तीत जास्त महिलांनी महिला मंडळात सहभागी झाले पाहिजे. कार्यक्रम अध्यक्ष वासंती परवार यांनी अंधश्रद्धा खुळचट विचारातून आपण बाहेर आले पाहिजे, आपणावर होणारे अत्याचार विरोध केला पाहिजे व आपला संघर्ष चालू ठेवला पाहिजे असे म्हटले.

---

### कला अकादमीतर्फे आज जागतिक रंगभूमी दिवस

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २६ :** कला अकादमीतर्फे गुरुवार दि. २७ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता कला अकादमीच्या दिनानाथ मंगेशकर सभागृहात जागतिक रंगभूमी दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या प्रसंगी गोव्याचे कला व संस्कृती मंत्री तथा कला अकादमीचे अध्यक्ष गोविंद गावडे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार असून गोवा सरकारचे कला व संस्कृती सचिव सुनील अंचिपाका (आय.ए.एस) यांची खास निमंत्रीत म्हणून उपस्थिती या प्रसंगी लाभणार आहे. या समारंभाला जोडून जॉर्जिया स्थित कलाकारांतफे लाईफ ऑफ अ क्लोन हा नाटयप्रयोग लिबर्टी थिएटरतर्फे सादर होणार आहे. सदर दिवशी सकाळी ९.३० ते दुपारी १ दरम्यान उपरोल्लेखित नाटयकलाकारांतर्फे एका नाटयकार्यशाळेचे आयोजनही करण्यात आले आहे. नाटयप्रेमी रसिकांनी, नाटयविद्यार्थ्यांनी व कलाकारांनी नाटयप्रयोगास उपस्थित राहून जॉर्जियन नाटयकृतीचा आस्वाद घ्यावा तसेच कार्यशाळेसाठीही उपस्थिती लावावी वनाटयकलेच्या संदर्भात आपल्या जाणिवा वृध्दिंगत कराव्यात असे आवाहन कला अकादमीतफे करण्यात आले आहे.

# योग केल्याने शरीर, मन निर्मळ

## कमलेश बांदेकर | पतंजलि योग समिती साखळीच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २६ :** योग ही अंतर्गत साधना असून ती अखेरच्या श्वासापर्यंत करीत राहिली पाहिजे. योग साधनेमुळे शरीर आणि मन निर्मळ होऊन जीवन सुखकर व आनंददायी होते, असे उदगार गोवा पतंजली व भारत स्वाभिमानचे कमलेश बांदेकर यांनी काढले. ते पतंजलि योग समिती सांखळीच्या ६व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थाना-वरून मार्गदर्शन करीत होते.

ते पुढे म्हणाले,साखळीतील पतंजलि योग समितीने योगाचा प्रचार आणि प्रसाराचा जो ध्यास घेतला आहे.ती निच्छितच वाखाणण्याजोगी गोष्ट असून,नगराध्यक्षा सिद्धी पोरोब ज्या योगभगिनी आहेत, त्यांच्या सहकार्याने पतंजलि योग समितीने सांखळी परिसरांत योग' विद्येचा प्रचार आणि प्रसार करीत सांखळी शहराला योग अभ्यासाचे नंदनवन केले पाहिजे.

यावेळी त्यांच्या सोबत व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून समाज सेवक भिमराव देसाई व खास आमंत्रित म्हणून नगराध्यक्षा सौ.सिध्दी पोरोब आणि संदेश बाराजणकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष सौ.सिद्धी पोरोब म्हणाल्या, योग शारीरिक आणि मानसिक ताणतणाव कमी करण्याचे उत्तम साधन आहे.आजच्या धकाधकीच्या काळात हा ताण कमी करण्याचे कार्य पतंजलि योग समिती उत्तम रित्या करीत आहे.याकरिता त्यांनी समितीचे विशेष अभिनंदन केले.



साखळी : पतंजलि योग समिती सांखळीच्या वर्धापन दिनाच्या उद्घाटनप्रसंगी भिमराव देसाई, सिद्धी पोरोब, कमलेश बांदेकर, संदेश बाराजणकर, शांताराम काणेकर, मनोहर गांवस, संतोष भजे व इतर.

आपले शरीर आणि मन जशे आपण निर्मळ ठेवतो त्याचप्रमाणे आपला परिसर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.आम्ही सगळे मिळून सांखळी शहर कचरामुक्त करुया.ज्या ज्या वेळी समितीला नगरपालीकेचे सहकार्य लागेल त्या त्यावेळी आपण पतंजलि योग समितीच्या सोबत असेन, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी प्रमुख पाहुणे कमलेश बांदेकर यांच्या हस्ते ज्येष्ठ योग साधक आणि योग शिक्षक शांताराम काणेकर यांनी केलेल्या योग प्रसाराच्या कार्याची दखल घेऊन त्यांना शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र देउन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाची सुरुवात 'गुरूने दिला ज्ञानरुपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा' या प्रार्थनेने दिप प्रज्वलन करून झाली.त्यानंतर योग शिक्षक विशाल गावस यांच्या मार्गदर्शनाखाली लहान मुलांची योग प्रात्यक्षिके झाली. समितीचे अध्यक्ष संतोष भजे यांनी उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. तर अनील वेर्णेकर यांनी अहवाल वाचन केले.

गौरव मूर्तींची ओळख श्याम पेडणेकर यांनी केली तर झिलू गांवकर यांनी मानपत्राचे वाचन केले. या कार्यक्रमास राज्य प्रभारी विश्वास कोरगावकर, गिरिश परूळेकर आणि संध्या खानोलकर यांची विशेष उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योग साधिका सौ.ममता गांवस यांनी केले. कार्याध्यक्ष मनोहर गांवस यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# साखळी नववर्ष स्वागत समितीच्या अध्यक्षपदी सचिन कर्पे

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २६ :** साखळी नववर्ष स्वागत समितीची बैठक साखळीतील ओमकार भवन येथे होऊन यावर्षी गुढी पाडव्यादिनी नववर्ष स्वागताचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे ठरविण्यात आले.

यावेळी निवडण्यात आलेल्या नववर्ष स्वागत समितीच्या अध्यक्षपदी सचिन कर्पे यांची तर सचिवपदी श्याम पेडणेकर यांची निवड करण्यात आली. रविवार दि. ३० रोजी गुढीपाडव्या दिवशी सकाळी ६ वजल्यापासून साखळीच्या जुन्या बसस्थानकावर हिंदू नववर्ष स्वागत यात्रा हा सोहळा होणार आहे. सकाळी ६ ते ६.३० वाजेपर्यंत एकत्रिकरण व व्यवस्था, ६.४५ वाजता ध्वजपूजन व आरोहण होणार, ७.५ ते ७.४५ या वेळेत जुने बसस्थानक ते गोकुळवाडी येथील श्री राधाकृष्ण मुरलीधर संस्थान अशी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ७.५० वाजता घंटानाद व ८ वजता समारोप होणार आहे. या सोहळ्यास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



साखळी : नववर्ष स्वागत सोहळ्यासाठी निवडण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष सचिन कर्पे, सचिव श्याम पेडणेकर व इतर पदाधिकारी.

नववर्ष स्वागत सोहळ्यासाठी निवडण्यात आलेली समिती अध्यक्ष सचिन कर्पे, उपाध्यक्ष अमोल बेतकीकर, सचिव श्याम पेडणेकर, सहसचिव लवू गोवेकर, खजिनदार अंजली हळर्णकर, सहखजिनदार अनूपा शेट वेरेकर. रांगोळी सजावट प्रमुख - रेश्मा मळीक, आकांक्षा सुतार, पूजा माडकर, संजना केरकर, प्रियांका बांदेकर. दिंडी प्रमुख दर्शना वाडकर, गजानन नार्वेकर, संचिता गावडे, आनंदी नाईक, भूमिका गावडे. शोभायात्रा व्यवस्था प्रमुख सुखलाल दातये, कपिल कर्पे, कला पावस्कर, क्रांती नार्वेकर, पूजा कामत. वाहन व्यवस्था प्रमुख सुशांत पाटील, प्रबोध बाक्रे, दत्तगुरू जोशी. प्रसिद्धी प्रमुख रवीराज च्यारी, सुरेश बायेकर, विशांत वझे, सिद्धार्थ कांबळी.

सल्लागार मंडळ शांताराम काणेकर, शशिकांत नाईक, आनंद काणेकर, स्वाती केरकर, नरेश दातये, दामोदर नाईक, मनोज सावईकर, राधिका कामत सातोस्कर, पंढरीनाथ पित्रे, सुकांत अवखळे, निशा पोकळे, धनंजय वाळके, रश्मी देसाई, करूणा बाक्रे, शुभदा सावईकर.

# फुटबॉल स्पर्धेत सी अँड डी फूटफायटर्स विजेते

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २५ :** रॉयल अमिगोस आगोंद यांनी आयोजित केलेल्या आगोंद शासकीय मैदानावर आयोजित केलेल्या ऑल गोवा ११ अ साईड फुटबॉल स्पर्धेत सी अँड डी फूटफायटर्स पाळोळे यांनी सेटिंग बॉईज, केपे संघाचा ५-१ असा पराभव करून विजय मिळवला.

अंतिम सामन्यासाठी काणकोण पालिका नगरसेवक शुभम कोमरपंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर तरुण उद्योजक सन्माननीय अतिथी नगरसेवक सायमन रिबेलो, नाथन फेर्नांडिस सन्माननीय एपीईओ किशोर बांदेकर, ऑस्ट्रॉन मुख्य आयोजक आणि यजमान फेली गोम्स हे सामन्यानंतरच्या बक्षिस वितरण समारंभ कार्यक्रमाच्या व्यासपीठावर उपस्थित होते. नगरसेवक शुभम कोमरपंत यांच्याहस्ते विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.



आगोंद : विजेत्यांना बक्षिसे प्रदान करताना नगरसेवक शुभम कोमरपंत व इतर.

# गुरुप्रती श्रद्धाभाव ठेवून विद्या आत्मसात करा

- ॲड. अवधूत नायक सलत्री
- पं. रत्नकांतबुवा रामनाथकर स्मृती संगीत संमेलनाचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २६ :** गुरुप्रती श्रद्धाभाव ठेवून विद्या आत्मसात करणारा शिष्य हा आयुष्यात नेहमीच यशस्वी होतो. गुरुकडून मिळविलेले ज्ञान ही शिष्यासाठी यशाची गुरुकिल्लीच असते म्हणूनच गुरु सदैव स्मरणात राहावा यासाठी गुरुंच्या स्मृती संमेलनासारख्या उपक्रमातून जागवल्या पाहिजेत, असे उद्गार सम्राट क्लब इंटरनॅशनलचे अध्यक्ष ॲड. अवधूत नायक सलत्री यांनी प्रमुख पाहुणे या नात्याने काढले. पणजी येथील नादब्रह्म संस्थेच्या ४३व्या पं. रत्नकांतबुवा रामनाथकर स्मृती संगीत संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पणजी येथील मिनेझेस ब्रागांझा सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात व्यासपीठावर विशेष निमंत्रित म्हणून मिनेझेस ब्रागांझा संस्थेचे सदस्य सचिव अशोक परब, रामनाथकरबुवांचे सत्शिष्य पं. धर्मानंद गोलतकर, पं. कमलाकर नाईक तसेच आयोजन संस्थेचे अध्यक्ष गजानन गोलतकर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या संगीत संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्व. रामनाथकर बुवांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. यावेळी बोलताना अशोक परब म्हणाले की गोव्यात आग्रा घराण्याच्या कंठ गायकीला आकार देण्याचे महत्कार्य बुवांनी केले. आजची संगीत क्षेत्रातील पिढी ही शास्त्रीय संगीताच्या साधनेपेक्षा सुगम संगीताचे कार्यक्रम सादर करण्याला विशेष प्राधान्य देते, ही गोष्ट शास्त्रीय संगीताच्या दृष्टीने योग्य नाही. संगीत शिकणाऱ्या तरुण कलाकारांनी या विषयावर आत्ताच चिंतन आणि मनन करावे असा सल्ला त्यांनी दिला. गोव्यात हजारोच्या संख्येने शास्त्रीय संगीत शिकणारे विद्यार्थी आहेत मात्र संमेलनाच्या ठिकाणी त्यांची उपस्थिती असत नाही याबद्दल श्री. परब यांनी नाराजी व्यक्त केली.पं. कमलाकर नाईक यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात पं. रत्नकांतबुवा रामनाथकर गुरुजींच्या आठवणी सांगितल्या. गुरुकृपेमुळेच आपण घडल्याचे ते म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष गजानन गोलतकर यांनी स्वागत केले. दुर्गाकुमार नावती यांनी सूत्रनिवेदन केले. पं. धर्मानंद गोलतकर यांनी आभार मानले.उद्घाटन सत्रानंतर अमेय वाडीकर तसेच दीपेश मिस्त्री यांचे शास्त्रीय गायन झाले. प्रा अमर मोपकर यांचे तबला स्वतंत्र वादन तर समारोपाच्या सत्रात बुवांचे सत्षिष्य पं. कमलाकर नाईक यांचे गायन झाले. या कलाकारांना तबल्यावर नितीन कोरगावकर आणि अमर मोपकर यांनी साथसंगत केली तर संवादिनीवर प्रसाद गावस व दत्तराज म्हाळशी यांनी साथ संगत केली. संगीत क्षेत्रातील जाणकारांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.



पणजी - संगीत संमेलनाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे ड. अवधूत नायक सलत्री, अशोक परब, पं.कमलाकर नाईक, पं. धर्मानंद गोलतकर व गजानन गोलतकर.

# पंजाब किंग्जचा ११ धावांनी विजय

## कर्णधार श्रेयसच्या नाबाद ९७ धावा | सलामीवीर प्रियांश आर्यच्या ४७ धावा

**अहमदाबाद, दि. २६ :**

आयपीएल-१८ च्या ५व्या सामन्यात पंजाब किंग्जने गुजरात टायटन्सचा ११ धावांनी पराभव केला. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. पंजाबने २० षटकांत ५ गडी गमावून २४३ धावा केल्या. त्यानंतर गुजरातला २० षटकांत ५ बाद २३२ धावा करता आल्या.

पंजाबकडून श्रेयस अय्यरने नाबाद ९७ आणि शशांक सिंगने नाबाद ४४ धावा केल्या. दोघांमध्ये ८१ धावांची नाबाद भागीदारी झाली. सलामीवीर प्रियांश आर्यने ४७ धावा केल्या. गुजरातकडून साई किशोरने ३ विकेट्स घेतल्या. तर कागिसो रबाडा आणि राशिद खान यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. धावांचा पाठलाग करताना गुजरातकडून साई सुदर्शनने ७४ धावा आणि जोस बटलरने ५४ धावा केल्या. शेवटच्या षटकात दोन विकेट पडल्या.

पंजाबने हंगामातील पहिला विजय मिळवला आहे. संघाने गुजरातचा ११ धावांनी पराभव केला. सामन्याच्या शेवटच्या षटकात दोन विकेट पडल्या. राहुल तेवतिया पहिल्याच चेंडूवर धावचीत झाला. त्यानंतर अर्शदीपने रदरफोर्डला बोल्ड केले.

१८ व्या षटकात, जोस बटलरने चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याच षटकात मार्को यान्सनने त्याला बोल्ड केले.



१७ वे षटक घेऊन मैदानात आलेल्या विजयकुमार वैशाखने ५ धावांचा षटक टाकला. येथून गुजरातला जिंकण्यासाठी १८ चेंडूत ५७ धावांची आवश्यकता आहे. १३ व्या षटकात गुजरातने दुसरी विकेट गमावली. येथे साई सुदर्शन ७४ धावा करून बाद झाला. त्याला अर्शदीप सिंगने शशांक सिंगच्या हातून झेलबाद केले. या षटकात गुजरातने १५० धावांचा टप्पा ओलांडला.

११ व्या षटकात पंजाबच्या क्षेत्ररक्षकांनी दोन झेल सोडले. ग्लेन मॅक्सवेल हा षटक टाकत होता. बटलरने षटकातील दुसरा चेंडू कव्हर्सवरून खेळला. यान्सनने मागच्या दिशेने धावून झेल घेण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी झाला. षटकाच्या पाचव्या चेंडूवरही कव्हर्सवर झेल चुकला. यावेळी साई सुदर्शनने शॉट खेळला, पण श्रेयस अय्यरला तो पकडता आला नाही.

साई सुदर्शनने दहाव्या षटकात आपले अर्धशतक पूर्ण केले. चहलच्या चेंडूवर एक धाव घेत त्याने अर्धशतक पूर्ण केले. या षटकात गुजरातने १०० धावांचा टप्पा ओलांडला. ७ व्या षटकात साई सुदर्शनला जीवदान मिळाले. स्टॉयनिसच्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ओमरझाईने थर्ड मॅन बाउंड्रीवर कॅच सोडला. २४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने पॉवरप्लेमध्ये एका विकेटच्या मोबदल्यात ६१ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिल ३३ धावा करून बाद झाला.

गुजरातकडून कर्णधार शुभमन गिल आणि साई सुदर्शन सलामीला आले. पंजाबकडून अर्शदीप सिंगने पहिले षटक टाकले. त्याने षटकात ५ धावा दिल्या.

**दोन्ही संघांचा प्लेइंग-११**

**गुजरात टायटन्स :** शुभमन गिल (कर्णधार), जोस बटलर (यष्टीरक्षक), साई सुदर्शन, शाहरुख खान, राहुल तेवतिया, आर साई किशोर, अर्शद खान, राशिद खान, कागिसो रबाडा, मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा.

**पंजाब किंग्ज :** श्रेयस अय्यर (कर्णधार), प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक), प्रियांश आर्य, शशांक सिंग, मार्कस स्टॉयनिस, ग्लेन मॅक्सवेल, सूर्यांश शेडगे, अझमतुल्लाह ओमरझाई, मार्को यान्सन, अर्शदीप सिंग आणि युजवेंद्र चहल.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 204 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .